पत्रकारिता ना तो पक्ष है ना विपक्ष, यह असल में जनपक्ष है : पद्मश्री विजयदत्त श्रीधर

वर्धा, 04 नवंबर 2026 : हिंदी पत्रकारिता के दो सौ वर्ष पूरे होने के उपलक्ष्य में महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा के जनसंचार विभाग द्वारा दो दिवसीय राष्ट्रीय संगोष्ठी के उद्घाटन समारोह में सप्रे संग्रहालय, भोपाल के संस्थापक पद्मश्री विजयदत्त श्रीधर ने कहा कि पत्रकारिता ना तो पक्ष है ना विपक्ष, यह असल में जनपक्ष है।

हिंदी पत्रकारिता के दो सौ वर्ष : विरासत, सरोकार और विकसित भारत का संकल्प' विषय पर आयोजित संगोष्ठी का उद्घाटन बुधवार, 04 नवंबर को कस्तूरबा सभागार में किया गया। कार्यक्रम की अध्यक्षता विश्वविद्यालय की कुलपति प्रो. कुमुद शर्मा ने की। इस अवसर पर राष्ट्रीय पुस्तक न्यास, भारत के पूर्व अध्यक्ष प्रो. बलदेवभाई शर्मा सारस्वत अतिथि तथा कुशाभाऊ ठाकरे पत्रकारिता एवं जनसंचार विश्वविद्यालय, रायपुर के कुलपति प्रो. मनोज दयाल मुख्य अतिथि के रूप में उपस्थित रहे। विश्वविद्यालय के कुलसचिव डॉ. सुरेन्द्र गादेवार मंचासीन थे।





पद्मश्री विजयदत्त श्रीधर ने मुद्रित माध्यमों के गौरवपूर्ण इतिहास की क्रमिक घटनाओं पर विस्तार से प्रकाश डाला। उन्होंने भाषा और अभिव्यक्ति की गुण सम्पन्नता के साथ शैली तथा कौशल की महत्ता पर ध्यान केंद्रित कराया। साथ ही पत्रकारिता की विभिन्न परंपराओं का स्मरण किया। हिंदी पत्रकारिता की विकास यात्रा को रेखांकित करते हुए उन्होंने युगल किशोर शुक्ल, भारतेंदु हरिचंद्र, बाबूराव पराडकर आदि की पत्रकारिता को समृद्ध ऐतिहासिक विरासत बताया।

प्रो. मनोज दयाल ने कहा कि मैं पत्रकारिता का इतिहास जब पढ़ता हूं तो खून में आग लगने लगती है। पत्रकारिता में आज अर्थशास्त्र के सिद्धांत लागू हो रहे हैं। पत्रकारिता से भावनाएं लुप्त होती जा रही है। भारत की पत्रकारिता में समाचार की परिभाषा पश्चिम से ली गई। उस परिभाषा को भारतीय परिप्रेक्ष्य में परिवर्तन करने की आवश्यकता है। उन्होंने कहा कि संवेदना और भावनाएं पत्रकारिता के केंद्र में होनी चाहिए। उन्होंने हिंदी अखबारों का डिजिटल संग्रहालय बनाने का प्रस्ताव रखा।



प्रो. बलदेव भाई शर्मा ने कहा कि भारतीय हिंदी पत्रकारिता का 200 वर्षों का इतिहास अत्यंत गौरवशाली रहा है। स्वाधीनता के बाद भारतीय पत्रकारिता के इतिहास को पत्रकारों और विद्यार्थियों को पर्याप्त रूप से नहीं पढ़ाया गया। भारतीय पत्रकारिता के इतिहास का अध्ययन और अध्यापन किया जाए, तो केवल मीडिया पर्सन नहीं, बल्कि वास्तविक अर्थों में पत्रकार तैयार होंगे। जिनका दायित्व गलत का विरोध करना है, चाहे वह सरकार की हो या समाज की। लोककल्याण और राष्ट्रीय चेतना को पत्रकारिता के दो प्रमुख स्तंभ बताते हुए उन्होंने आत्मचिंतन का संदेश दिया और कहा— "बाहर की तू माटी फाँके, मन के अंदर क्यों न झाँके।" उन्होंने कहा कि लोककल्याण व राष्ट्रीय चेतना ही पत्रकारिता का सरोकार होना चाहिए।

अध्यक्षीय उद्बोधन में कुलपति प्रो. कुमुद शर्मा ने कहा कि हिंदी पत्रकारिता के इतिहास को पढ़ते समय औपनिवेशिक दासता से मुक्ति की गाथा दिखाई देती है। स्वाधीनता आंदोलन की पत्रकारिता आंदोलन का एक प्रमुख शस्त्र बन गयी थी। हिंदी पत्रकारिता को संघर्ष की गाथा बताते हुए उन्होंने कहा कि पत्रकारिता पर लोकतांत्रिक मूल्यों के संवर्धन का बड़ा दायित्व है।

स्वागत वक्तव्य मानविकी एवं सामाजिक विज्ञान विद्यापीठ के अधिष्ठात प्रो. के. बालराजु ने दिया। कार्यक्रम का प्रास्ताविक जनसंचार विभाग के अध्यक्ष डॉ. राजेश लेहकपुरे ने किया। संचालन जनसंचार विभाग की सहायक प्रोफेसर डॉ. रेणु सिंह ने किया तथा सहायक प्रोफेसर डॉ. संदीप कुमार वर्मा ने आभार ज्ञापित किया। अतिथियों का स्वागत सूतमाला, शॉल एवं विश्वविद्यालय का प्रतीक चिन्ह से किया गया। इस अवसर

पर स्मारिका का विमोचन, जनसंचार विभाग की ओर से वृत्तचित्र का प्रदर्शन तथा मीडिया समय का विमोचन किया गया। कार्यक्रम का प्रारंभ दीप प्रज्ज्वलन एवं कुलगीत गायन से किया गया।

इस अवसर पर वीणा पत्रिका के संपादक राकेश शर्मा, दक्षिण भारत हिंदी प्रचार सभा, चेन्नई के पूर्व कुलपति प्रो. राममोहन पाठक, भारतीय जनसंचार संस्थान, नई दिल्ली के पूर्व महानिदेशक प्रो. संजय द्विवेदी सहित विश्वविद्यालय के अधिष्ठाता, विभागाध्यक्ष, शिक्षक, शोधार्थी एवं विद्यार्थी बड़ी संख्या में उपस्थित रहे।

मराठी :

पत्रकारिता ही पक्ष किंवा विपक्ष नव्हे तर जनतेच्या हिताची असावी : पद्मश्री विजयदत्त श्रीधर

वर्धा, दि. ४ नोव्हेंबर २०२६ : हिंदी पत्रकारितेची दोनशे वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा येथील जनसंचार विभागाच्या वतीने आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभात सप्रे संग्रहालय, भोपाळचे संस्थापक पद्मश्री विजयदत्त श्रीधर म्हणाले की पत्रकारिता ही पक्ष वा अपक्षाची नव्हे तर ती मुळात जनतेच्या हिताची असावी, असे प्रतिपादन केले.

'हिंदी पत्रकारितेची दोनशे वर्षे : वारसा, सामाजिक बांधिलकी आणि विकसित भारताचा संकल्प' या विषयावर आयोजित चर्चासत्राचे उद्घाटन बुधवार, ४ नोव्हेंबर रोजी कस्तुरबा सभागृहात करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्वविद्यालयाच्या कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा होत्या. यावेळी सारस्वत अतिथि म्हणून राष्ट्रीय पुस्तक न्यास, भारताचे माजी अध्यक्ष प्रो. बलदेवभाई शर्मा तर कुशाभाऊ ठाकरे पत्रकारिता व जनसंचार विद्यापीठ, रायपूरचे कुलगुरू प्रो. मनोज दयाल हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. विश्वविद्यालयाचे कुलसचिव डॉ. सुरेन्द्र गादेवार यांचीही मंचावर उपस्थिती होती.

पद्मश्री विजयदत्त श्रीधर यांनी मुद्रित माध्यमांच्या गौरवशाली इतिहासातील विविध घटनांचा सविस्तर आढावा घेतला. भाषा आणि अभिव्यक्तीची समृद्धता, लेखनशैली तसेच पत्रकारितेतील कौशल्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. पत्रकारितेच्या विविध परंपरांचे स्मरण करून हिंदी पत्रकारितेच्या विकासप्रवासावर प्रकाश टाकला. युगल किशोर शुक्ल, भारतेंदू हरिश्चंद्र आणि बाबूराव पराडकर यांचे पत्रकारितेतील योगदान हा हिंदी पत्रकारितेचा समृद्ध ऐतिहासिक वारसा असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रो. मनोज दयाल म्हणाले की, पत्रकारितेचा इतिहास वाचताना रक्त उसळून येते. आज पत्रकारितेत अर्थशास्त्राची तत्त्वे लागू होत असून, पत्रकारितेतून भावना आणि संवेदनशीलता हळूहळू लोप पावत आहे. भारतीय पत्रकारितेतील बातमीची व्याख्या पाश्चात्त्य देशांकडून स्वीकारण्यात आली आहे. मात्र, या व्याख्येत भारतीय संदर्भानुसार बदल करण्याची गरज आहे. संवेदना आणि भावना या पत्रकारितेच्या केंद्रस्थानी असल्या पाहिजेत, असे त्यांनी सांगितले. तसेच हिंदी वृत्तपत्रांचे डिजिटल संग्रहालय उभारण्याचा प्रस्तावही त्यांनी मांडला.

प्रो. बलदेवभाई शर्मा म्हणाले की, भारतीय हिंदी पत्रकारितेचा दोनशे वर्षांचा इतिहास अत्यंत गौरवशाली आहे. मात्र, स्वातंत्र्यानंतर भारतीय पत्रकारितेच्या इतिहासाचे पुरेसे अध्ययन पत्रकार आणि विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी करण्यात आले नाही. भारतीय पत्रकारितेच्या इतिहासाचा अभ्यास आणि अध्यापन झाल्यास केवळ मीडिया पर्सन नव्हे, तर खऱ्या अर्थाने जबाबदार पत्रकार घडतील. सरकार असो किंवा समाज, चुकीच्या गोष्टींना विरोध करणे हे पत्रकारांचे कर्तव्य आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. लोककल्याण आणि राष्ट्रीय चेतना हे पत्रकारितेचे दोन प्रमुख आधारस्तंभ असल्याचे सांगून त्यांनी आत्मचिंतनाचा संदेश दिला. 'बाहेरची तू माती फांके, मन के अंदर क्यों न झांके' या ओळींचा उल्लेख करत त्यांनी पत्रकारितेचे खरे उद्दिष्ट लोककल्याण आणि राष्ट्रीय चेतना हेच असले पाहिजे, असे प्रतिपादन केले.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा म्हणाल्या की, हिंदी पत्रकारितेचा इतिहास अभ्यासताना औपनिवेशिक गुलामगिरीतून मुक्त होण्याचा संघर्ष दिसून येतो. स्वातंत्र्यलढ्यातील पत्रकारिता हे आंदोलनाचे एक प्रमुख शस्त्र बनले होते. हिंदी पत्रकारिता ही संघर्षाची गाथा असून, लोकशाही मूल्यांचे संवर्धन करण्याची मोठी जबाबदारी पत्रकारितेवर आहे, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे स्वागतपर भाषण मानविकी व सामाजिक विज्ञान विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रो. के. बालराजू यांनी केले. चर्चासत्राचे प्रास्ताविक जनसंचार विभागाचे अध्यक्ष डॉ. राजेश लेहकपुरे यांनी केले. संचालन विभागाच्या सहायक प्रोफेसर डॉ. रेणू सिंह यांनी केले, तर सहायक प्रोफेसर डॉ. संदीप कुमार वर्मा यांनी आभार मानले.

मान्यवरांचे स्वागत सुतमाला, शाल आणि विश्वविद्यालयाचे स्मृतिचिन्ह देऊन करण्यात आले. यावेळी स्मरणिकेचे प्रकाशन, जनसंचार विभागाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या माहितीपटाचे प्रदर्शन तसेच 'मीडिया समय' चे विमोचन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्ज्वलन आणि विश्वविद्यालयाच्या कुलगीताने झाली.

या प्रसंगी 'वीणा' मासिकाचे संपादक राकेश शर्मा, दक्षिण भारत हिंदी प्रचार सभेचे (चेन्नई) माजी कुलगुरू प्रो. राममोहन पाठक, भारतीय जनसंचार संस्थान, नवी दिल्लीचे माजी महासंचालक प्रो. संजय द्विवेदी यांच्यासह विश्वविद्यालयाचे अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक, शोधार्थी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नमस्कार! मा. संपादक/संवाददाता
महोदय, कृपया संलग्न समाचार को प्रकाशित कर अनुगृहीत करने का कष्ट करें।
सादर धन्यवाद।